# भारतातील ऑटो सेक्टर आणि भविष्यातील संधी

भारतीय वाहन उद्योग नेहमीच अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा एक महत्त्वपूर्ण घटक राहिला आहे, कारण हे क्षेत्र निर्मिती आणि निर्यातीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. वाढत्या मध्यमवर्गामुळे टू-व्हीलर इतर वाहनांच्या बाबतीत आघाडीवर आहे. प्रवासी वाहतूक आणि लॉजिस्टिक्स उद्योगांच्या वाढीमुळे व्यवसायासाठी लागणाऱ्या वाहनांची मागणी वाढत आहे. इलेक्ट्रिक वाहनांचे, विशेषतः थ्री-व्हीलर आणि लहान प्रवासी कारचे विद्युतीकरण यासारख्या नवीन ट्रेंडमुळे भविष्यात ह्या क्षेत्राची बाजारपेठ वाढणे अपेक्षित आहे.

आर्थिक वर्ष 2022 मध्ये, भारताने वार्षिक 2.29 कोटी वाहने तयार केली. निर्यात आणि देशांतर्गत मागणी दोन्ही दृष्टींनी भारताचे उत्पादन मोठे आहे. 2023-24 च्या पहिल्या तिमाहीत, प्रवासी वाहने, व्यावसायिक वाहने, थ्री व्हीलर, टू व्हीलर आणि क्वाड्रीसायकल यांचे एकूण उत्पादन 60 लाख युनिट्स होते. आर्थिक वर्ष 2023 मध्ये विकल्या गेलेल्या प्रवासी वाहनांची एकूण संख्या 38.9 होती. आर्थिक वर्ष 2023 मध्ये भारताचे एकूण 47,61,487 वाहनांची निर्यात झाली. या क्षेत्राने राष्ट्रीय जीडीपीच्या 1992 मधील टक्केवारी पेक्षा सुमारे 7.1% पर्यंत वाढवली आहे. तसेच या क्षेत्राची जाळे मोठे आहे यामध्ये 1.9 कोटी लोक थेट आणि अप्रत्यक्षरीत्या कार्यरत आहे.

---

शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करण्यासाठी खालील दिलेल्या लिंक वरुण Demat अकाऊंट ओपेन करा:

1) Upstox- https://upstox.com/open-account/?f=2RBF

2) Angel Broking- https://angel-one.onelink.me/Wjgr/gdl6iyu8

---

Motors आणि Volkswagen सारख्या परदेशी कंपन्यांनी त्यांची किंमत आणि डिझाइन सोडून मोठ्या भारतीय मध्यमवर्गीय लोकसंख्येची गरज पूर्ण करण्यासाठी नवनवीन गोष्टींचा

अवलंब केला आहे ज्याच्या वापराने ह्या कंपन्या देशांतर्गत कंपन्यांशी थेट स्पर्धा करू शकतात, म्हणून हे क्षेत्र अत्यंत स्पर्धात्मक बनले आहे.

भारत सध्या कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक कारकडे आपले लक्ष्य केंद्रित करत आहे. भारताने 2023-24 (ऑगस्ट 2023 पर्यंत) मध्ये 8,32,434 ईव्हींची विक्री करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. इलेक्ट्रिक वाहनांच्या बाबतीत, गेल्या वर्षाच्या विक्रीपेक्षा 168% वार्षिक वाढ झाली. IESA (इंडिया एनर्जी स्टोरेज अलायन्सच्या) एक अहवालात अंदाज व्यक्त केला आहे की 2026 पर्यंत भारतातील ईव्ही मार्केटचा 36% CAGR वाढण्याची शक्यता आहे.

वाहन उद्योगात नुकत्याच अनेक गुंतवणूक आल्या आहेत, कारण सरकार अपेक्षा करतो की 2023 पर्यंत वाहन उद्योग स्थानिक आणि परदेशी गुंतवणूकीतून 8-10 अब्ज डॉलर मिळवेल. या उद्योगाने एप्रिल 2000 ते मार्च 2023 पर्यंत US$ 34.74 बिलियन मूल्याचे परदेशी गुंतवणूक इक्विटी इनफ्लो (FDI) आकर्षित केले आहेत. पुढील 8-10 वर्षांत एकूण US$ 200 अब्ज गुंतवणुकीसह, भारत 2030 पर्यंत सर्वात मोठी ईव्ही बाजारपेठ बनण्याच्या मार्गावर आहे.

शेअर मार्केट बद्दल नवनवीन संकल्पना शिकण्यासाठी तसेच अपडेटेड राहण्यासाठी आजच आमच्या YouTube चॅनलला Subscribe करा.

https://www.youtube.com/@SHAMBHURAJKHAMKAR

© Shambhuraj Khamkar Trading Academy

अर्थसाक्षरतेतून समृद्धीकडे

Call Us On: 8802809090